# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**मंगळवार, दिनांक १७ जुलै, २०१२**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

(१) **गृह मंत्री** : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २००९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०१२ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ८६१ आश्वासनांची यादी आणि विधानसभेचे सन १९९१ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन ते सन २०१२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन या कालावधीत विधानसभा सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी ३१८ आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **सर्वश्री सुभाष देसाई,** अनिल गोटे**,** पंकज भुजबळ, हर्षवर्धन जाधव, विनोद घोसाळकर, रविंद्र वायकर**,** वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"म्हाडाच्या जुन्या झालेल्या वसाहतीची पुनर्बांधणी शक्य व्हावी म्हणून म्हाडा प्राधिकरणाने पुनर्विकास योजनेअंतर्गत मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिका हद्दीतील व इतर जिल्ह्यात विकास नियमावली ३३(५) अन्वये पुनर्विकास प्रस्तावाची कार्यपध्दती तथा मार्गदर्शक तत्त्वांनुसार सवलती जाहीर करणे व त्या अनुषंगाने मोडकळीला आलेल्या इमारती पुनर्बांधणीसाठी विकासकांशी करार करुन रहिवाशांच्या इमारती रिकाम्या करुन त्या इमारतीतील रहिवाशांना इतरत्र तात्पुरत्या जागेत वा संक्रमण शिबिरात स्थलांतरित करणे, इमारती मोडकळीस आल्यामुळे विकासकाने पाडून टाकणे, परंतु म्हाडा प्राधिकरणाने अचानक धोरणात बदल करुन प्रत्येक पुनर्रचित होणाऱ्या इमारतीमध्ये स्वत:साठी काही गाळे (हाऊसिंग स्टॉक) मिळावेत अशी मागणी विकासकांकडे करणे, म्हाडा प्राधिकरणाने केलेली सदर अव्यवहार्य मागणी पूर्ण करणे शक्य नसल्यामुळे गृहनिर्माण सोसायट्या व विकासकांनी म्हाडाच्या बदलेल्या धोरणास प्रतिसाद न देणे, त्यामुळे माहे सप्टेंबर, २०१० पासून पुनर्विकासांची सर्व कामे ठप्प असणे, त्याचप्रमाणे अनेक प्रकरणे मा.मुख्यमंत्र्यांकडे अंतिम

निर्णयात्मक कार्यवाहीसाठी प्रलंबित असणे, पुनर्विकासासाठी पाडून ठेवलेल्या इमारतीमधील रहिवाशांना वर्षांनुवर्षे संक्रमण शिबिरात वा तात्पुरत्या जागेत राहावे लागत असल्यामुळे त्यांना नविन घर केव्हा मिळेल वा आपण आपले घर गमावून बसलो आहोत काय असा संभ्रम निर्माण होऊन त्यांच्यात पसरलेले चिंतेचे वातावरण, त्यामुळे हवालदिल झालेल्या हजारो कुटुंबांमध्ये वाढता असंतोष व असुरक्षिततेची भावना, या प्रकरणी मा.मुख्यमंत्री तथा राज्याच्या गृहनिर्माण मंत्र्यांनी तातडीने त्यांच्या दफ्तरी प्रलंबित असलेली पुनर्विकास कामाबाबतची प्रकरणे निकाली काढण्यासाठी करावयाची उपाययोजना."

(२) **ॲड.अशोक पवार,** श्री.संजय वाघचौरे वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडून सन २००९ ते २०१२ या कालावधीत अनेक बनावट धरणग्रस्तांना जमीन वाटप होणे, याबाबत विधानसभा सदस्य शिरुर यांनी जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे दिनांक १५ मे, २०१२ रोजीच्या पत्रान्वये व विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक १९ मार्च, २०१२ व दिनांक १६ जानेवारी, २०११ च्या पत्रान्वये चौकशीची मागणी करुनही कोणतीही कार्यवाही न होणे, चासकमान धरणातील बुडीत गाव, चिखलगाव येथील बनावट धरणग्रस्त लुना होना डामसे, मयत वारस धोंडु लुना डामसे व इतर यांची त्यांचे नावे असलेली चिखलगाव येथील जमीन स.नं. ८६ क्षेत्र ३ हे १८ आर व स.न.८७ क्षेत्र ४ हे २२ आर. या दोन्ही गटापैकी काहीच जमीन बुडीत क्षेत्रात गेलेली नसताना संकलन रजिस्टरमध्ये जमीन बुडीत क्षेत्रात गेल्याची खोटी नोंद करुन सदर धरणग्रस्तास मौजे सणसवाडी ता.शिरुर येथील जमीन वाटप करण्यात येणे, मौजे सणसवाडी ता.शिरुर येथील जि.पु.अ. यांचे नावे असलेल्या ग.नं. २७४/२, २८९/२, २८६/२ या जमिनी एल ॲन्ड टी कंपनीस वाटप करण्यात येणे, सदर जमिनी धरणग्रस्तास वाटप केलेल्या असताना ४ वर्षांनी त्या काढून घेवून एल ॲन्ड टी कंपनीस वाटप करण्यात येणे, चिखलगाव येथील धरणग्रस्त बाबू कृष्ण मुके यांची प्रत्यक्ष जमीन पाण्यात फक्त ०.०३ आर गेलेली असताना संकलन नोंदवहीमध्ये ९२ १/२ आर गेलेली आहे असे खोटे दर्शविणे, व त्यांना जि.पु.अ.यांनी जि.पु.अ./चास/एस.आर/१७/२०१० दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० अन्वये कोरेगाव भिमा व शिक्रापूर येथील १ हे २० आर जमीन वाटप करणे, अशा खोट्या माहितीच्या आधारे जि.पु.अ. श्री.शेळके यांनी देय जमिनीपेक्षा जास्त जमीन वाटप व जमीन बुडीत क्षेत्रात गेली नसली तरी बनावट धरणग्रस्तास जमीन वाटप करणे, जि.पु.अ. श्री.शेळके यांच्या कार्यकाळात अशा अनेक जमिनी वाटपाबाबत नागरीकांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे अनेकवेळा तक्रारी करुनही कुठलीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री विवेक पंडित,** श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री विवेक पाटील, सुभाष देसाई, विनोद घोसाळकर, उमाजी बोरसे, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री धनराज महाले, दादाजी भुसे, एकनाथराव खडसे-पाटील, ए.टी.पवार, शिरिष कोतवाल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"नाशिक जिल्ह्यातील संपूर्ण गिरणा खोऱ्यासाठी वरदान ठरणारी मांजरपाडा क्र.२ ही वळण योजना गेल्या कित्येक दिवसांपासून शासन स्तरावर प्रलंबित असणे, तापी व गिरणा

खोऱ्यात या संदर्भात प्रचंड आंदोलने झालेली असणे, त्यामुळे या प्रश्नाला गंभीर स्वरुपाचे वळण लागल्याने शासनाने त्याची दखल घेवून दिनांक २१ नोव्हेंबर, २००८ रोजी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्या उपस्थितीत मंत्रालयातील दालनात बैठक घेवून "मांजरपाडा क्र-२ या योजनेच्या तापी खोऱ्यासाठी त्वरित मंजुरी देण्यात येवून मांजरपाडा योजनेचे पाणी गोदावरी खोऱ्याला व वांजुळपाडा योजनेचे पाणी तापी खोऱ्याला देवू व दोन्ही कामे एकाच वेळी सुरु करण्यात येतील" असा महत्वपूर्ण निर्णय होणे, मांजरपाडा वळण बंधारा क्र.१ च्या कामास प्रशासकीय मान्यता मिळून या योजनेचे काम पूर्ण होत आले असणे, परंतु तापी खोऱ्यातील शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न असलेल्या मांजरपाडा क्र.२ वळण बंधाऱ्यांच्या कामास प्रशासकीय मंजुरी व निधी न मिळणे, यामुळे तापी व गिरणा खोऱ्यात नागरीकांमध्ये प्रचंड प्रमाणात शासनाविरोधात वाढलेला असंतोष, दिनांक २० जुलै, २०११ रोजी मा.पालकमंत्री, जलसंपदा मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत १५ दिवसांच्या आत प्रशासकीय मान्यता देवून कार्यवाही करावी असा आदेश होणे व मा.जलसंपदा मंत्री यांनी "सप्टेंबर, ऑक्टोबर, २०११ च्या शेवटी भूमीपूजनाचा कार्यक्रम होईल" असे ठोस आश्वासन देणे, यानंतरही वारंवार पाठपुरावा करुनही काहीच कार्यवाही न होणे, यामुळे नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता मांजरपाडा क्र.२ च्या कामांना तातडीने मंजुरी देवून सदर कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, शासनाने या संदर्भात तात्काळ निर्णय घेण्याची गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**सहा : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान ( दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग.

(३) सार्वजनिक आरोग्य विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरित केल्याप्रमाणे)**

**[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ६.०० वाजता]**

**सात : सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक जाधव, सुरेश लाड, मधु चव्हाण, दिपक केसरकर, अमिन पटेल, मानसिंग नाईक, कालिदास कोळंबकर, डॉ.अनिल बोंडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"शासनाने शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती केलेली असणे, राज्यात आयएएस व आयपीएस या परिक्षेत राज्यातील बरेच विद्यार्थी उत्तीर्ण होत असणे, राज्यातील मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय स्तुत्य असणे, आर्थिक दुर्बल घटकाना शिक्षण देण्यासाठी काही नियमसुध्दा केलेले असणे, राज्यातील शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देत असताना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या जाचक अटींमुळे व त्यांच्याकडून निधी वेळेवर मिळत नसल्यामुळे

शिक्षणाचा दर्जा राखण्यास असमर्थ असणे, केंद्र शासनाने नुकताच शिक्षण हक्क कायदा (राइट टू एज्युकेशन) संमत केला असून सर्व राज्यांना याची अंमलबजावणी करण्याचे दिलेले निदेश, या कायद्यानुसार राज्यातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण द्यावे लागणार असणे, प्रत्येक शिक्षण संस्थेत गरीब विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचे शासनाने दिलेले निदेश, परंतु त्यासाठी निधीची व्यवस्था करण्यात आली नसणे, शिक्षण संस्थांना नॉनटिचिंग अनुदान देण्यात न येणे, गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यात होत असलेला विलंब, त्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या अडचणी, राज्यात सीबीएसई बोर्डाला मिळत असलेली परवानगी, बरेच विद्यार्थी त्याकडे आकृष्ट होणे, निरक्षरांची वाढत असलेली संख्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात येत असलेल्या अडचणी, शासनाकडून शिष्यवृत्ती वेळेवर न मिळणे, त्यामुळे त्यांच्या शिक्षणावर होत असलेला विपरित परिणाम, वार्षिक १ लाख रु.पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना शासनाने सुरु केली असणे, त्याचे नियम जाचक असल्यामुळे त्याचा फायदा गरीब कुटुंबाला मिळत नसणे, राज्यातील खाजगी मोठ्या रुग्णालयात गरीबांसाठी ५ टक्के खाटा राखीव ठेवण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, परंतु याची अंमलबजावणी करण्यास खाजगी मोठ्या रुग्णालयांनी विरोध केल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी सुध्दा न होणे, त्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, सर्व शिक्षा अभियान योजनेचा तसेच गोरगरीबांना राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक १० एप्रिल, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (क्रमांक १)**

(१) **श्री. गिरीष महाजन, वि.स.स.**

**" शेतकऱ्यांच्या आत्महत्या तसेच विविध प्रश्नांवर डॉ.नरेंद्र जाधव व डॉ.स्वामीनाथन आयोग यांनी केलेल्या शिफारशीबाबत "** या विषयावरील श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६२६६५ ला दिनांक २२ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(मंगळवार, दिनांक १७ एप्रिल, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ ते ६)**

(२) **श्री.चिंतामण वनगा, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचा-यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांची होणारी गैरसोय"** या विषयावरील श्री.नानाजी शामकुळे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०२६८ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री.रविंद्र चव्हाण, वि.स.स.**

**"राज्यात भेसळयुक्त दुधाचा होत असलेला पुरवठा"** या विषयावरील श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६७०५६ ला दिनांक

२१ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.**

**"संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेच्या अनुदानात वाढ करण्याबाबत"** या विषयावरील श्री. अतुल देशकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ६४४१८ ला दिनांक २१ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **प्रा. अतुल देशकर, वि.स.स.**

**"प्रमुख लोकप्रिय वृत्तपत्रांमध्ये मसाज पार्लर, लैंगिक व्यवसायासंबंधीच्या प्रकाशित होणाऱ्या जाहिरातींवर तातडीने प्रतिबंध घालण्याबाबत"** या विषयावरील श्री. लखन मलिक व इतर वि.स.स यांचा दिनांक १६ डिसेंबर,२०११ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३०० मधील प्रश्न क्रमांक ४२७६३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(६) **श्री. सरदार तारासिंग, वि.स.स.**

**"गडचिरोली जिल्हा निहाय विकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत "** या विषयावरील श्री. सुधीर मुनगंटीवार व इतर वि.स.स यांचा दिनांक १६ डिसेंबर,२०११ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३०९ मधील प्रश्न क्रमांक ३३२२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ७ व ८ )**

(७) **श्री.प्रकाश महेता, वि.स.स.**

**"घाटकोपर (पूर्व) मुंबई येथे सर्व्हे क्र.२३६ 'अ' मध्ये आरक्षित शासकीय रुग्णालय,तालुका क्रिडा संकुल, स्मशानभूमीच्या कामाबाबत"** या विषयावरील श्री.प्रकाश महेता,वि.स.स. यांचा दिनांक २७ मार्च,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३३९ मधील प्रश्न क्रमांक ५५३२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(८) **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.**

**"विदर्भातील प्रलंबित सिंचन प्रकल्पास निधीची तरतूद करण्याबाबत"** या विषयावरील श्री.वामनराव कासावार व इतर,वि.स.स. यांचा दिनांक २९ मार्च,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३४९ मधील प्रश्न क्रमांक ६४५०८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१२ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ९ व १०)**

(९) **श्री.सुधीर मुनगंटीवार,वि.स.स.**

**"मुल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील राजोली (माजी मालगुजारी) तलावासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत"** या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार,वि.स.स. यांच्या दिनांक १० एप्रिल,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ३६५ मधील प्रश्न क्रमांक ६६७१३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१०) **श्री.देवेंद्र फडणवीस,वि.स.स.**

**"नागपूर शहरातील रामझुला उड्डाणपुलाचे बांधकाम मागील दिड वर्षापासून बंद असल्याबाबत"** या विषयावरील श्री.विकास कुंभारे व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २० एप्रिल,२०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ३८२ मधील प्रश्न क्रमांक ६२४७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १६ जुलै, २०१२.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.